महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

======================================================================

जावक क्रमांक – ७५०/५०

दिनांक :- २० एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' मुंबई मंडळातर्फे २३ एप्रिल रोजी जनता दरबार दिनाचे आयोजन

'म्हाडा'चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. २० एप्रिल २०२५ : नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने आणि न्यायपूर्ण निराकरण व्हावे, यासाठी 'म्हाडा' मुख्यालयात राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाप्रमाणेच, 'म्हाडा'च्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जनता दरबार दिनाचे आयोजन बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२.०० ते ०२.०० या दरम्यान मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या विविध विभागांसाठी ठरविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वाच्या घटकाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी मंडळ स्तरावर जनता दरबार दिन राबविण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृह, तिसरा मजला येथे हा कार्यक्रम दुपारी १२.०० वाजता सुरु होईल. मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील ११४ अभिन्यासात सुमारे २.५० लाख सदनिका आहेत. तसेच मंडळातर्फे मोठ्या प्रमाणात पुनर्वसन प्रकल्प राबविले जात आहेत.

करिता अधिकाधिक नागरिकांनी मंडळातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या संधीचा लाभ घेत या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या तक्रारी संबंधित लेखी निवेदनाच्या स्वरूपात, २२ एप्रिल २०२५ पर्यंत म्हाडाच्या वांद्रे स्थित मुख्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील कक्ष क्रमांक ४०८ , सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्या कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन मुंबई मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

Outward No. : 750/50 Dt. April 20, 2025

**Press Release**

**MHADA's Mumbai Board to hold Janata Darbar Day on April 23**

Immediate implementation of 100-Day Action Plan as per the directives of MHADA Vice President Sanjeev Jaiswal

Mumbai, April 20, 2025: To ensure timely and fair resolution of citizens' grievances, the Mumbai Housing and Area Development Board of MHADA will organize a Janata Darbar Day on Wednesday, April 23, 2025, from 12:00 PM to 2:00 PM, under the chairmanship of the Board's Chief Officer Mr. Milind Borikar. This initiative is being conducted in the same spirit as the Lokshahi Day observed at MHADA Headquarters.

Under the guidance of Hon'ble Chief Minister Mr. Devendra Fadnavis and Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Mr. Eknath Shinde, a 100-Day Action Plan has been formulated for various government departments. As part of this plan, the critical component of "citizen grievance redressal" is being actively implemented. MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal has instructed all regional boards to organize Janata Darbar Days to ensure this component is effectively executed.

Accordingly, the Janata Darbar program will commence at 12:00 PM in the Gulzarilal Nanda Auditorium, 3rd Floor, MHADA Headquarters, Bandra (East), under the leadership of Mr. Milind Borikar. The Mumbai Board oversees approximately 2.5 lakh (250,000) housing units across 114 layouts, and is also undertaking several large-scale redevelopment projects.

The Mumbai Board urges citizens to take full advantage of this opportunity by participating in the initiative and submitting their complaints in written form by April 22, 2025. The complaints should be submitted at Room No. 408, Office of the Joint Chief Officer, Mumbai Board, 3rd Floor, MHADA Headquarters, Bandra (East).

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 750/50 Dt. April 20, 2025

**प्रेस नोट**

# म्हाडा मुंबई मंडल की ओर से 23 अप्रैल को "जनता दरबार दिवस" का आयोजन

म्हाडा के उपाध्यक्ष संजीव जयसवाल के निर्देशानुसार 100 दिवसीय कार्य योजना का तत्काळ कार्यान्वयन

मुंबई, दिनांक 20 अप्रैल 2025 : नागरिकों की शिकायतों का त्वरित और न्यायपूर्ण समाधान सुनिश्चित करने हेतु, म्हाडा मुख्यालय में आयोजित किए जाने वाले "लोकशाही दिन" की तर्ज पर, म्हाडा के मुंबई गृहनिर्माण एवं क्षेत्रविकास मंडल की ओर से बुधवार, दिनांक 23 अप्रैल 2025 को दोपहर 12:00 बजे से 2:00 बजे तक "जनता दरबार दिवस" का आयोजन किया जा रहा है। यह कार्यक्रम मंडल के मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर की अध्यक्षता में आयोजित होगा।

मुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्र फडणवीस एवं उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री माननीय श्री एकनाथ शिंदे के मार्गदर्शन में राज्य शासन के विभिन्न विभागों के लिए तैयार की गई 100 दिवसीय कार्य योजना के अंतर्गत "नागरिकों की शिकायतों का निवारण" इस महत्वपूर्ण घटक के प्रभावी कार्यान्वयन के लिए म्हाडा के उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयसवाल ने मंडल स्तर पर जनता दरबार दिवस आयोजित करने के निर्देश दिए थे।

इसी के तहत यह कार्यक्रम बांद्रा (पूर्व) स्थित म्हाडा मुख्यालय के तीसरी मंज़िल पर गुलजारीलाल नंदा सभागृह में दोपहर 12:00 बजे से शुरू होगा। मुंबई मंडल के अधीन 114 लेआउट्स में लगभग 2.50 लाख आवासीय इकाइयाँ हैं और मंडल द्वारा कई बड़े पुनर्वसन परियोजनाएं भी संचालित की जा रही हैं।

मुंबई मंडल की ओर से नागरिकों से अपील की गई है कि वे इस उपक्रम में भाग लेकर अपनी शिकायतें दिनांक 22 अप्रैल 2025 तक लिखित निवेदन के रूप में म्हाडा के बांद्रा स्थित मुख्यालय की तीसरी मंज़िल पर कक्ष क्रमांक 408, सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडल के कार्यालय में जमा करें।

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी, म्हाडा